Bar Council of Maharashtra & Goa
2nd Floor, High Court Extension, Fort, Mumbai - 400 032. ✆ : 022-6938 1033 / 6938 1037
Website : www.barcouncilmahgoa.org • Email : barcouncilmahgoa@gmail.com

जावक क्रमांक जनरल/ॲडमिन/१८१००/२०२५ दि. ३१/१०/२०२५

प्रति,

अध्यक्ष/सचिव
सर्व वकील संघ महाराष्ट्र व गोवा,
दादरा नगर हवेली, दिव व दमण

विषय — दिनांक ०३/११/२०२५ रोजीच्या न्यायालयीन कामकाजापासून अलिप्त राहण्याच्या निर्णयासंबंधीचा फेर ठराव.

महोदय,

दिनांक २८/१०/२०२५ रोजी उलट तपासणीचे कामकाज करणारे शेवगाव वकील संघ ता. शेवगाव जिल्हा अहिल्यानगर येथील वकील बंधू श्री.रविंद्र सकट यांनी उलट तपास केल्यामुळे साक्षीदाराने त्यांच्यावर गंभीर हल्ला केला. या प्रकरणासंबंधी महाराष्ट्रामधील वकील वर्गात उमटलेल्या तीव्र भावना व विषेश करुन वकील संरक्षण कायदयाची मागणी यासाठी सर्व संबंधीताचे लक्ष वेधण्याकरिता महाराष्ट्रातील वकील बंधू भगिनींनी न्यायालयीन कामकाजापासून अलिप्त राहण्याचा ठराव दिनांक २९/१०/२०२५ रोजी महाराष्ट्र व गोवा वकील परिषदेने पारित करुन त्याची सूचना सर्व बार असोसिएशनला दिली होती.

या संबंधी मुंबई उच्च न्यायालयाचे मा.मुख्य न्यायमुर्ती श्री. श्री चंद्रशेखर साहेब यांनी दखल घेवून बार कौन्सिलच्या सर्व सदस्यांबरोबर तातडीची बैठक बोलवून मा.न्यायमुर्ती श्रीमती. रेवती मोहिते ढेरे, मा.न्यायमुर्ती श्री.एम.एस.सोनक, मा. न्यायमुर्ती श्री.रविंद्र घुगे, मा.न्यायमुर्ती श्री. अजय गडकरी,तसेच ॲडिशनल सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया श्री. अनिल सिंग व महाराष्ट्र राज्याचे महाअधिवक्ता डॉ.बिरेंद्र सराफ यांच्या बरोबर आज दिनांक ३१/१०/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता बैठक बोलवली त्यामध्ये महाराष्ट्र राज्याचे महाअधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ व ॲडीशनल सॉलिसिटर जनरल श्री. अनिल सिंग हे सर्व सहभागी झाले या सर्वांनी झालेल्या घटनेचा निषेध करुन वकील वर्गावर झालेल्या हल्ल्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली आहे. तसेच यासंबंधीचे प्रकरण उच्च न्यायालयाने सोमवारी दिनांक ०३/११/२०२५ रोजी मा.मुख्य न्यायमुर्ती यांच्यासमोर पुढील कारवाईसाठी ठेवलेले आहे त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा. महाअधिवक्ता यांनी अशा घटना घडू नये म्हणून व वकील वर्गाना संरक्षण देण्याकरिता महाराष्ट्रातील राज्य पोलीस महासंचालक, पोलिस आयुक्त व सर्व जिल्हयाचे पोलीस अधिक्षक यांना तात्काळ सूचना देण्यात येतील असे आश्वासन दिलेले आहे. तसेच वकील सरक्षण कायदा याची याबाबत तांत्रिक पूर्तता करुन ३ महिन्यांच्या आत कायदा आणण्याचे लेखी आश्वासन दिलेले आहे. विधी व न्याय खात्याचे प्रधान सचिव श्रीमती.सुवर्णा केवले यांनी तसे पत्र मुंबई उच्च न्यायालयाला दिलेले आहे. तसेच मिटींग चालू असतांना बैठकीदरमान्य बीसीएमजीचे सदस्य ॲड. संग्राम डी.देसाई यांनी माहिती दिली की गोवा राज्याचे ॲडव्होकेट जनरल श्री. देविदास

पंगम यांनी आश्वासन दिले आहे की गोवा राज्य देखील लवकरात लवकर वकील संरक्षण कायदा लागू करण्यासाठी आवश्यक पावले उचलेल.

विशेष करुन मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेल्या या तातडीच्या निर्णयामुळे वकील सरंक्षण कायदा मंजूर होण्यास न्यायीक पाठबळ मिळणार आहे.

तसेच मिटींग चालू असतांना मा.सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश श्री.भुषण गवई साहेब यांचा फोन बार कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य श्री. आशिष देशमुख यांना आला. मा.सरन्यायाधिश साहेबांनी सांगितले की, वकील संरक्षण कायदा पारित करण्यासंबंधी मी स्वतः मा. मुख्यमंत्र्यांशी दिनांक ०५/११/२०२५ रोजी या वकील संरक्षण कायदयासंबंधात चर्चा करुन तो येत्या हिवाळी अधिवेशनमध्ये पारित करावा असे सांगणार आहे.

या सर्व परिस्थितीत सन्माननीय मुख्य न्यायमुर्तीच्या या तातडीच्या हस्तक्षेपामुळे त्यांचा आदर कायम ठेवण्याकरिता दिनांक ०३/११/२०२५ रोजीचे नियोजित आंदोलन हे कोटाला लाल फिती लावून करण्याचा निर्णय बार कौन्सिलने घेतलेला आहे व उच्च न्यायालयाने तसेच शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार कारवाई होईल या अपेक्षेने दिनांक ०३/११/२०२५ रोजी न्यायालयाच्या कामकाजापासून अलिप्त राहण्याचा निर्णय स्थगित केला आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये हा वकील सरंक्षण कायदा पारित झालाच पाहिजे असे बार कौन्सिलचे अध्यक्ष श्री. अमोल सावंत यांनी ठाम व खंबीर भूमिका मांडली आहे व इतर सर्व सदस्यांनी त्यास पाठिंबा दिला आहे. त्यासंदर्भात शासनाने लेखी पत्र देवून बार कौन्सिला आश्वासित केले आहे, त्या लेखी आश्वासनाची प्रत यासोबत जोडलेली आहे.

त्यानुसार सर्व वकील संघाने आपआपल्या न्यायालयात न्यायालयीन कामकाज करतांना लाल फिती लावून झालेल्या घटनेचा निषेध करावा व न्यायालयीन कामकाजात सहभाग घ्यावा असा फेर ठराव महाराष्ट्र व गोवा वकील परिषेदेने केलेला आहे. त्यानुसार आपल्या वकील संघातील सभासदांना कळवावे ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| ॲड. अमोल एस.सावंत | ॲड.अहमदखान पठाण | ॲड.आशिष पी.देशमुख |
| **अध्यक्ष** | **उपाध्यक्ष** | **सदस्य** |
| **बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा** | **बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा** | **बार कौन्सिल ऑफ इंडिया** |

**सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| **ॲड. मोतीसिंग जी.मोहता** | **ॲड. गजानन बी. चव्हाण** | **ॲड. मिलिंद एस. पाटील** | **ॲड. वसंत डी. साळुंके** |
| **ॲड. मिलिंद एस.थोबडे** | **ॲड. हर्षद व्ही. निबांळकर** | **ॲड.अण्णाराव जी. पाटील** | **ॲड.अविनाश जे. भिडे** |
| **ॲड. सतिष ए. देशमुख** | **ॲड. जयंत डी.जायभावे** | **ॲड. वसंतराव इ. भोसले** | **ॲड. सुदिप आर.पासबोला** |
| **ॲड. अनिल एम. गोवरदिपे** | **ॲड. सुभाष जे. घाटगे** | **ॲड. विवेकानंद घाटगे** | **ॲड.विठ्ठल बी.कोडे देशमुख** |
| **ॲड. आशिफ कुरेशी** | **ॲड. डॉ.उदय वारुंजीकर** | **ॲड.संग्राम डी.देसाई** | **ॲड. अविनाश बी. अव्हाड** |
| **ॲड. रार्जेंद्र बी.उमाप** | **ॲड. पारिजात एम.पांडे** | | |

GOVERNMENT OF MAHARASHTRA

Suvarna Kishor Keole
Principal Secretary & R.L.A.

BAR COUNCIL OF MAHARASHTRA AND GOA
High Court
Inward No. 13586
Date 31 OCT 2025

LAW AND JUDICIARY DEPARTMENT
GOVERNMENT OF MAHARASHTRA
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032
*www.maharashtra.gov.in*

Date : 31 OCT 2025

**Ref.:1)** Meeting of the Hon'ble Administrative Judges' Committee of the Hon'ble Bombay High Court, Mumbai with the Advocate General, State of Maharashtra.

**2)** As per the instructions by the Government of Maharashtra.

**Respected Sir,**

You are requested to kindly place this letter before the Hon'bleThe Chief Justice, Bombay High Court, Mumbai.

1. The Government has taken note of a recent incident involving an attack on an advocate while he was discharging his professional duties as an advocate and as an officer of the Court. The Government also notes with concern that similar incidents have taken place in the recent past. The Government strongly deprecates any such attack on advocates, recognizing the vital role played by members of the Bar in the administration of justice.

2. In order to ensure better security arrangements in court premises, it has been decided that the concerned Superintendent of Police in each District shall hold a meeting with the concerned (District Judge) to assess security arrangement and work out appropriate measures to prevent recurrence of such incidents. In the event of any such

incident, the police authorities shall take immediate and appropriate action in accordance with law.

3. The Government has also received representations from the legal fraternity seeking enactment of a law to ensure the safety and security of advocates. The Government shall examine these representations and take an appropriate decision within three months, taking into consideration the legislations framed by other States on this subject.

Yours Faithfully,

(Suvarna K. Keole)

**To**
**The Registrar/Principal Secretary**
**to the Hon'ble The Chief Justice,**
**Bombay High Court, Mumbai.**

**Copy to:**

1) Chairman, Bar Council of Maharashtra & Goa.